जगभर

तुमचा पैसा आमच्या करामती

चंद्रशेखर पुरंदरे

आधीच आर्थिक व्याधींनी ग्रासलेल्या पश्चिमेला जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून नवीन सणसणीत दणका बसला. नव्या व्याधीचे आता फक्त निदान झाले आहे. व्याप्ती किती अवाढव्य आहे याचा अंदाजही कठीण आहे. जागतिक स्तरावरील आघाडीच्या बँका (स्विस UBS, जर्मन Deutsche, ब्रिटिश Barclays, अमेरिकन Chase, Citi वगैरे) अधिकृतरीत्या गेली अनेक वर्षे - किमान २००५ पासून पैशाची प्रचंड अफरातफर करत असल्याचे उघडकीस येऊ लागले. या अप्रामाणिकपणात त्यांच्यावर कडक नजर ठेवणे ज्यांच्याकडून अपेक्षित असते, त्या सरकारी यंत्रणेची मूक संमती तरी होती किंवा यंत्रणाच ह्या कामाला अक्षम होती असाही संदेह निर्माण झाला आहे.

LIBOR

हे प्रकरण प्रामुख्याने बँका एकमेकांना तारण नसलेली कर्जे ज्या व्याजाने देतात त्या व्याजदराशी निगडित आहे. त्याचबरोबर या बाजारावर आधारित अनेक आर्थिक व्यवहार जगात होत असतात. १९८६ पर्यंत या व्याजदरावर एकसूत्री नियंत्रण नव्हते. ते असावे म्हणून London Inter Bank Offered Rate (LIBOR) या परिमाणाचा जन्म झाला. संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेसाठी LIBOR हे प्रमाण आहे. बँकांनी हा व्याजदर (LIBOR) कृत्रिमपणे, कमी-जास्त ठरवण्याच्या घटना उघडकीला येणे ही आर्थिक त्सुनामी. समजा एखाद्याला घर विकत घेण्यासाठी बँकेतून कर्ज काढायचे आहे. LIBOR त्यावेळी एक टक्का आहे. हा ग्राहक ज्या बँकेकडे कर्जासाठी जातो, ती बँक स्वत:चे दोन टक्के LIBOR वर लावते आणि ग्राहकाला तीन टक्केने कर्ज देते. अफरातफर झाली ती एक टक्का दर ठरवण्यात. तो एक टक्का असायला हवा होता तेव्हा तो दीड टक्का कृत्रिमपणे ठरवण्यात आला तर ग्राहक हकनाक अर्धा टक्का जास्त दराने कर्ज घेतो. (सोईकरता हे उदाहरण दिले आहे. वस्तुत: LIBOR कमी करण्यात बँकांचा फायदा होता पण तत्त्व तेच, ते पुढे पाहू.)

LIBOR कसा ठरवला जातो? जागतिक स्तरावरील बँका LIBOR काय असावा याचा आपल्याला अपेक्षित आकडा सांगतात. प्रत्येक बँक असा अपेक्षित व्याजदर सांगते. त्यामागे बँकेचे स्वत:चे हिशेब असतात. या शिफारशींची चढती किंवा उतरती क्रमवारी करण्यात येते. वरचे चार व खालचे चार आकडे बाद ठरवण्यात येतात. ते अवास्तव जास्त किंवा कमी आहेत असे धरले जाते. मधल्या क्रमवारीची सरासरी काढली जाते, तो LIBOR. हा उद्योग रोज केला जातो. लंडनच्या वेळेनुसार रोज सकाळी साडे अकरा वाजता त्या दिवशीचा LIBOR जाहीर केला जातो. नुसते बँकांच्या एकमेकांतील उधारीचे व्याजदर इतके याचे स्वरूप मर्यादित नाही. मोठ्या कंपन्या बँकांकडून काय दराने उचल करतात, शेअर बाजार, म्युच्युअल फंड, डेरिवेटिव्हज् अशी अनेक आर्थिक उत्पादनेही LIBOR वर आधारित असतात. एका अंदाजानुसार ८०० ट्रिलियन डॉलर्सची उलाढाल LIBOR वर अधिष्ठित आहेत. (एक ट्रिलियन म्हणजे एकावर बारा शून्ये)

बार्कलेज्

२००७ च्या आर्थिक संकटापासून LIBOR कृत्रिमपणे वरखाली 'फिक्स' करायला सुरूवात झाली. सगळ्याच मोठ्या बँका त्यात अडकणार आहेत. पण बार्कलेज या ब्रिटिश बँकेने या संभाव्यतेचा अंदाज घेऊन आपला सहभाग स्पष्ट करायला आपणहून संमती दिली. त्यात अमेरिकेत बार्कलेज्ला ४५० मिलियन डॉलर्सचा दंड ठोठावण्यात आला. मग ब्रिटिश सरकारने चौकशी सुरू केली. प्रथम चेअरमन, मग मॅनेजिंग डायरेक्टर यांनी राजीनामे दिले. खासदारांच्या चौकशी समितीपुढे मॅनेजिंग डायरेक्टरला बोलावण्यात आले. त्याचे या काळातल्या फोनवरील संभाषणांचे ध्वनिमुद्रण, खासगी डायरीतील नोंदी, सरकारी कामकाजाच्या नोंदी हे सगळे पुरावे म्हणून तपासण्यात आले. त्यात असे उघड झाले की बँक ऑफ इंग्लंडच्या (आपल्याकडच्या रिझर्व बँकेसारखी ही ब्रिटनची अग्रणी केंद्रीय बँक) पदाधिकाऱ्यांना - अगदी उपाध्यक्षापर्यंत - या करामतींची माहिती होती व त्यांची संमती होती. किंबहुना एका पुराव्यानुसार तर उपाध्यक्षाने बार्कलेजच्या मॅनेजिंग डायरेक्टरला सांगितले की मंत्रालयातून माझ्यावर अगदी वरच्या दर्जाहून 'बार्कलेज व्याजदर कमी का करत नाही' अशी विचारणा होत आहे. व्याजदर कमी करा असा हा आदेश असल्याचे आपल्याला वाटल्याचे मॅनेजिंग डायरेक्टरचे म्हणणे! उपाध्यक्षाने त्याच्या साक्षीत या गोष्टी साफ नाकबूल केल्या.

मुळात अशा गोष्टी स्पष्टपणे काळ्या-पांढऱ्या रंगात नोंदवल्या जात नाहीत हे लक्षात ठेवायला हवे. 'मी कायदा प्लीज मोडू का?' असे पोलिसाला कोणीच विचारत नाही, तर आपण कायदा

मोडल्यास पोलिस काय मर्यादेपर्यंत त्याकडे दुर्लक्ष करेल याचा अंदाज घेऊन कायदा मोडला तरी जातो किंवा त्यातून पळवाट तरी काढली जाते. विशेषत: आपला प्रत्येक अधिकृत संवाद ध्वनिमुद्रित होत आहे, डायरीतील प्रत्येक नोंद उद्या कायदेशीर दस्तऐवज म्हणून वापरली जाण्याची शक्यता आहे हे माहिती असल्यावर बँकेचा मॅनेजिंग डायरेक्टर किंवा राष्ट्रीय नाणेनिधीचा उपाध्यक्ष ही मुरब्बी मंडळी करड्या रंगातच वावरणार आणि त्यातून संदिग्ध इशारेच वाचता येणार. प्रत्यक्षात LIBOR फिक्स करण्यात आला हे तर उघड आहे.

तत्कालीन परिस्थिती

२००७ ला जागतिक आर्थिक मंदी सुरू झाली. त्याचा फटका बँकांबरोबरच सरकारांनाही बसला. LIBOR जास्त असला तर बँकेची किंवा सरकारची आर्थिक स्थिती डळमळीत आहे असे मानले जाते. जागतिक बाजारपेठेतील पत कमी होते. पैसा उभा करणे महाग जाते. त्यामुळे व्याजदर कमी दाखवण्याचा बार्कलेने प्रयत्न केला. म्हणजे, समजा, १५ बँका LIBOR ठरवतात, तर बार्कलेने आपला त्या दिवशीचा व्याजदर इतका कमी ठेवला की बार्कले शेवटच्या चारमध्ये जाईल हे नक्की झाले. बँकेची प्रतिमा 'स्थिर' बँक रहाण्यात याची मदत झाली. हा प्रकार इतर बँकांच्या संगनमतानेही केल्यावर LIBOR च खाली दाखवला गेला आणि सरकारही (म्हणजे सरकारची गंगाजळी) 'स्थिर' असल्याचा आभास झाला. त्यामुळे आपल्याला तर आरोपी म्हणून खेचले आहे तर त्यातला सरकारचा हातभागही उघड करा, इतर बँकांचेही हात तितकेच अस्वच्छ आहेत हे उघड करा अशी आता बार्कलेची चाल आहे.

परिणाम

संपूर्ण बँकिंग क्षेत्राची पुनर्रचना, बँकांवर नजर ठेवणाऱ्या सरकारी यंत्रणेची क्षमता व सतर्कता वाढवणे आणि दोघांच्यातील विशेष साटेलोटे मर्यादित करणे हे उपाय आता अमेरिका, ब्रिटन योजत आहे.

खरा धोका पुढेच आहे. ज्या संस्था किंवा व्यक्ती यांना या करामतींमुळे अधिक भुर्दंड पडला ते ग्राहक त्या-त्या बँकांवर नुकसानभरपाईचे खटले दाखल करतील. वर म्हटल्याप्रमाणे अब्जावधी डॉलर्सची उलाढाल LIBOR प्रमाण मानून होत असते. यातली काही मंडळी जरी दावेदार म्हणून उभी राहिली तरी नुकसानभरपाईच्या रकमा अब्जाच्या घरात जातील. एक बँक एकटी अशा वेळी बुडत नाही तर तिला पैसे दिलेल्या अनेक बँका धोक्यात येतात. मग यांना वाचवायला सरकार परत पैसे कोठून आणणार? आधीच एकामागून एक पश्चिमेतील राष्ट्रे दिवाळखोर होत आहेत. (त्याचवेळी, ज्यांचा फायदा झाला, ते ग्राहक पैसे परत करणार नाहीत!) आधीच बँकर्सचे कोट्यवधी डॉलर्सचे वैयक्तिक बोनस लोकांच्या असंतोषाला कारणीभूत आहेत. त्यात अशा करतूतींची भर पडली आहे. तरीही यात वैयक्तिक फायद्यासाठी भ्रष्टाचार झाला नाही हे लक्षात घ्यावे लागेल. जो संस्थात्मक भ्रष्टाचार झाला तो संस्थेची (बँक किंवा देश) प्रतिमा उजळ करण्यासाठी झाला. त्याचे प्रमाण अवाढव्य आहे; पण अनैतिकता संदिग्ध आहे. आपल्याकडच्या वैयक्तिक भ्रष्टाचारातील रकमा त्यापुढे क्षुद्र वाटाव्यात. आणखी एका मानवनिर्मित संस्थेची विश्वासार्हता गाळात गेली आहे; हे मात्र नक्की.

E-mail - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com